# प्रेसनोट

पारपात्र कार्यालयाकडून पारपत्र देण्यासंदर्भातील प्रकिया पार पाडलेनंतर पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या पडताळणीसाठी एक ते दोन महिने कालावधी लागत होता. त्यानंतर हा कालावधी ३६ दिवसांवर आला.दरम्यान पोलीस आयुक्त, डॉ. के. वेंकटेशम यांनी पुढाकार घेवुन पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या पडताळणीचा कालावधी आणखी कमी करण्याची सुचना दिली आणि पडताळणीचा कालावधी ११ दिवसांवर आणण्यावर पुणे पोलीसांच्या विशेष शाखेला यश आले आहे. येत्या काही दिवसांत १० दिवसांचे आत पडताळणी करण्याचे उद्दीष्ट पोलीसांकडून ठेवण्यात आले आहे.

नियमाप्रमाणे पोलीसांनी पारपत्र संदर्भातील पडताळणी २१ दिवसांत करणे बंधणकारक आहे मात्र पारपत्रासाठी दाखल होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेवुन २१ दिवसांत पडताळणी करणे शक्य होत नव्हते. पोलीस आयुक्त, डॉ. के. वेंकटेशम यांनी पोलीस अधिकारी यांची बैठक घेवुन त्यांना मार्गदर्शन केले होते. त्यानुसार आता पोलीसांकडून पारपत्र पडताळणी ११ दिवसांवर आणण्यात यश आले आहे.येत्या काही दिवसात पारपत्र पडताळणी १० दिवसांचे आत करुन देण्याचे उद्दीष्ठ ठेवण्यात आले आहे. पुणे शहरातून पारपत्र काढण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यंदा ०१ जानेवारी २०१८ ते ०१ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीत ९,३८,६७८ जणांनी पारपत्र कार्यालयाकडे पारपत्र मिळण्यासाठी अर्ज केले आहेत. जुलै महिन्यापर्यंत पडताळणीसाठी ३६ दिवसांचा कालावधी लागत होता. पोलीस आयुक्तांनी दिलेल्या सुचनांनंतर विशेष शाखेचे पोलीस उप-आयुक्त, अशोक मोराळे व सहा. पोलीस आयुक्त, डॉ. प्रिती टिपरे यांचे मार्गदर्शनाखाली कामकाज सुरु केले. त्यांनी कर्मचारी यांना प्रोत्साहन दिले. त्यानंतर दीड महिन्यात पारपत्र पडताळणीचा कालावधी ११ दिवसांवर आणण्यात आला.

## पारपत्र पडताळणीचा कालावधी असा कमी झाला.

पारपत्र पडताळणीसाठी पोलीसांना अर्जदारांशी संपर्क साधावा लागतो, पोलीस ठाणेकडून विशेष शाखेमध्ये पाठविणाऱ्या टपालात वेळ खर्ची पडत होता. बऱ्याचदा पारपत्रासाठी अर्ज केलेला व्यक्ती कामानिमीत्त बाहेर असल्याने पोलीसांना त्या व्यक्तीशी संपर्क साधावा लागायचा त्यामुळे अर्जदाऱ्यांच्या वेळेशी जुळवुन घेण्याच्या सुचना शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना देण्यात आल्या. येत्या काही दिवसात टपालसेवा बंद करण्यात येईल. कागदपत्रे पोलीस ठाण्यात स्कॅन करुन अधिकाऱ्यांच्या सहीसह ई-मेलव्दारे विशेष शाखेत पाठविण्यात येणार आहे.

(अशोक मोराळे)
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा १, पुणे शहर